दिनांक १९.०६.२०२६.

**प्रेस नोट**

लोकसेवक मोहन भगवानराव माने, वय ४३ वर्ष, पद सहायक कृषी अधिकारी, नेमणुक कृषी सहायक, सज्जा जलालपुर, ता. औंढा (ना) यांनी तक्रारदार यास ६,०००/— रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ५,०००/— रूपये लाचेची मागणी करून सदरची ५,०००/— रूपयाची रक्कम पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांचे विरूद्ध पोलीस स्टेशन औंढा (ना), गु. रनं ४८४/२०२६ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल केले बाबत.

---

दिनांक १८.०६.२०२६ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांनी त्यांचे वडिलोपार्जित शेत जमीन गट क्रमांक २११ मौजे दोडगाव, तालुका औंढा (ना.) जिल्हा हिंगोली येथे केळीची लागवड केलेली आहे. तक्रारदार यांना केळी पिकाचे अनुदान मिळण्यासाठी सहा मस्टरवर सही करून ते तालुका कृषी अधिकारी यांचेकडे पाठवण्यासाठी प्रत्येक मस्टरचे १,०००/— रुपये प्रमाणे सहा मस्टरचे ६,०००/— रुपये लाचेची मागणी करीत आहे अशी तक्रार कार्यालयास प्राप्त झाली.

दिनांक १८.०६.२०२६ रोजी लाच मागणी पडताळणी करण्याकरिता तक्रारदार यांना, पंच क्र. ०१ यांचे सह लोकसेवक यांची भेट घेण्याकरिता रवाना केले. भेटी दरम्यान आरोपी लोकसेवक माने यांनी तक्रारदार यांचेकडे, तक्रारदार यांनी त्यांचे वडिलोपार्जित शेत जमिनीमध्ये केलेल्या केळी लागवडीचे अनुदान मिळण्यासाठी सहा मस्टर वर सही करून ते तालुका कृषी अधिकारी यांचेकडे पाठवण्यासाठी प्रत्येक मस्टरचे १००० रुपये याप्रमाणे लाचेची मागणी करून, तडजोडीअंती सहा मस्टरचे ५,०००/— रुपये पंच क्रमांक ०१ यांचे समक्ष लाचेची मागणी केल्याचे लाच मागणी पडताळणी कारवाई मध्ये निष्पन्न झाले.

दिनांक १८.०६.२०२६ रोजी सापळा कारवाई दरम्यान ग्रॅज्युएट गुळाचे चहा टपरी समोर, हिंगोली—परभणी जाणारे रोडवर, औंढा ता. औंढा. ना. जिल्हा हिंगोली येथे आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडून पंचा समक्ष ५०००/— रुपये लाचेची रक्कम स्वत: स्विकारली असता, त्यांना लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडण्यात आले. त्यांचे विरूद्ध पोलीस स्टेशन औंढा नागनाथ, गुरनं ४८४/२०२६ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी मा. श्री श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली श्री विकास घनवट, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली, पोह/भगवान मंडलीक, गजानन पवार, पो.शि./शिवाजी वाघ, विनोद पुंडगे सर्व अॅन्टी करप्शन ब्युरो यांचे मदतीने यशस्वीपणे पुर्ण केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली तर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकिय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली यांचेशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहीजे असल्यास खालील नमुद क्रमांकावर संपर्क साधावा.

मा. श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मोबा. क्रमांक ९८२३४१०५०६.
श्री विकास घनवट, पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली, मोबा. क्रमांक ९८२२३५९९३२
टोल फ्रि क्रमांक १०६४, लॅन्ड लाईन क्रमांक ०२४५६—२२३०५५.
व्हॉटसअॅप क्रमांक :— ९३५९१२८८८९/९४२२०६१०६४.

( विकास घनवट )
पोलीस उप अधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली.

कार्यालय पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली